# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:03.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- पश्चिम बंगालमध्ये फलता मतदारसंघातील सर्व प्रभागात पुन्हा मतदान होणार–निवडणूक आयोगाचा निर्णय
- पश्चिम बंगालमध्ये काल पार पडलेल्या पुर्नमतदान प्रक्रियेत 90 टक्के मतदान उद्या मतमोजणी
- आपत्कालीन परिस्थितीत सतर्कतेसाठी मोबाइल ब्रॉडकास्ट या संदेश प्रसारण सुविधेचा शुभारंभ
- आणि
- मालीमध्ये 200 हल्लेखोरांना ठार केल्याचा मालीच्या संरक्षण दलाचा दावा.

**<u>पश्चिम-बंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये, दक्षिण 24 परगणा जिल्ह्यात फालता मतदार संघात सर्व प्रभागात मतदान प्रक्रिया रद्द करण्यात आली असून येत्या 21 मे रोजी पुर्नमतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. सहाय्यक मतदान केंद्रांसह सर्व 285 मतदान केंद्रांवर नव्याने मतदान घेतले जाईल. मतांची मोजणी 24 मे रोजी होईल. असं निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे. 29 एप्रिल रोजी झालेल्या मतदानादरम्यान गंभीर स्वरूपाचे निवडणूक गुन्हे घडल्याचं आणि लोकशाही प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर व्यत्यय आणल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

यामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये फेरफार करणे, मतदारांना धमकावणे अनेक मतदान केंद्रांवर, मतदान यंत्रांची बटणं हेतुपुरस्सर काळ्या टेपने झाकण्यात आली होती, ज्यामुळे मतदारांना योग्यरित्या मतदान करणे अशक्य झाले होते. तसेच, अनधिकृत व्यक्ती मतदान केंद्रांमध्ये प्रवेश करत असल्याचे आणि इतरांच्या वतीने मतदान करत असल्याचेही आढळून आले होते. अशा घटनांमुळे ही प्रक्रिया पुन्हा राबवली जात आहे.
काल झालेल्या फेरमतदानात एकंदर 90 टक्के मतदानाची नोंद झाली. यामध्ये मगराहाट पश्चिम मतदारसंघातील 11 आणि डायमंड हार्बर मतदारसंघातील चार मतदान केंद्रांचा समावेश आहे. या दोन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये फेरमतदान शांततेत पार पडले. या मतदान केंद्रांवर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत, गेल्या महिन्याच्या 29 तारखेला मतदान झाले होते.

सर्व केंद्रावरील मतमोजणी उद्या पार पडणार आहे. निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमध्ये मतमोजणी निरीक्षकांना सहाय्य करण्यासाठी एकूण 165 अतिरिक्त मतमोजणी निरीक्षक नेमण्यात आले आहेत; तर मतमोजणी केंद्रांच्या परिसरात सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी 77 पोलीस निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत.

पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरी इथं पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी उद्या होणार आहे. आसाममधील सर्व 126 जागा, केरळमधील 140 आणि पुद्दुचेरीमधील 30 जागांसाठीचे मतदान 9 एप्रिल रोजी पार पडलं होतं. तामिळनाडूतील सर्व 234 विधानसभा मतदारसंघांसाठी

आणि पश्चिम बंगालमधील पहिल्या टप्प्यांतर्गत 152 जागांसाठीचे मतदान 23 एप्रिल रोजी पार पडले. पश्चिम बंगालमधील दुसऱ्या टप्प्याचे मतदान गेल्या महिन्याच्या 29 तारखेला 142 मतदारसंघांसाठी झाले होते.

**ब्रॉडकास्ट**

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांपर्यंत जलदगतीनं सुरक्षा आणि इशारा विषयक संदेश पोहचवण्यासाठी केंद्र सरकारनं मोबाइल ब्रॉडकास्ट या संदेश प्रसारण सुविधेचा काल प्रारंभ केला. याअंतर्गत सराव चाचणीचा भाग म्हणून संपूर्ण देशभरात एकाचवेळी नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर इंग्रजी आणि स्थानिक भाषेतून आपत्कालीन इशारा देणारे संदेश पाठवले गेले.
केंद्रीय दूरसंवाद विभागानं स्वदेशी तंत्रज्ञान वापरून ही सुविधा विकसित केली असल्याची माहिती केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. हे संदेश म्हणजे सराव चाचणी असून, नागरिकांनी घाबरून जाऊ नये असंही त्यांनी म्हटलं आहे. भविष्यात कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत या सुविधेचा वापर करून नागरिकांना योग्य वेळेत, त्या ठिकाणच्या स्थानिक भाषांमध्ये संदेश पाठवले जातील असं त्यांनी सांगितलं. नागरिकांच्या सुरक्षेला बळकटी देणं तसंच आपत्कालीन परिस्थितीत जलदगतीनं माहिती पोहचवण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. आर. बालसुब्रमण्यम आणि डॉ. जोराम अनिया यांची नीती आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. त्यांचा समृद्ध अनुभव आणि विविध विषयांची सखोल जाण धोरण निर्मितीला मोठ्या प्रमाणात बळ देईल. असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. मंत्रिमंडळ सचिवालयाने राजपत्र अधिसूचनेद्वारे डॉ. बालसुब्रमण्यम आणि डॉ. अनिया यांच्या नियुक्तीबाबत माहिती दिली.

**प्रसारभारती अध्यक्ष**

प्रसार भारतीच्या अध्यक्षपदी गीतकार प्रसून जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं काल ही माहिती दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, जोशी यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन केलं आहे. जोशी यांनी यापूर्वी मुंबईच्या केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं आहे.

**माली**

मालीमध्ये, सुरक्षा दलांनी शुक्रवारी सकाळी केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये 200 हून अधिक हल्लेखोरांना ठार केले, असा दावा मालीच्या सरकारी दूरचित्रवाणीने केला आहे. सशस्त्र दलांच्या 'जनरल स्टाफ'च्या निवेदनाचे संदर्भ देत हा अहवाल प्रसारित करण्यात आला आहे. हे हवाई हल्ले सशस्त्र अतिरेक्यांच्या एका मोठ्या ताफ्यावर करण्यात आले. सशस्त्र दहशतवादी गटांनी 25 एप्रिल रोजी मालीतील अनेक शहरांवर हल्ले केले. तसंच, त्यांनी राजधानी 'बामाको' जवळ असलेल्या 'काटी' शहरात, संरक्षण मंत्री जनरल सादियो कामारा यांच्या निवासस्थानावरही हल्ले केले. या हल्ल्यात संरक्षण मंत्री आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला. 28 एप्रिल रोजी भारताने या आफ्रिकन राष्ट्रात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला आणि जनरल सादियो कामारा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, मालीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, असे आवाहन मालीतील भारतीय दूतावासाने केले आहे.

**<u>संरक्षणमंत्री-शौर्यसंध्या</u>**

दहशतवादाच्या समूळ उच्चाटनासाठीच्या केंद्र सरकारनं निर्धार केला असून ऑपरेशन सिंदूर हे याच निश्चयाचं प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल केलं. या मोहिमेदरम्यान सशस्त्र दलांनी दर्शवलेल्या अतुलनीय शौर्यामुळे लष्कराच्या इतिहासात याची नोंद सुवर्ण अध्याय म्हणून केली जाईल. असंही ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीनिमित्त दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या शौर्य या कार्यक्रमाला संबोधित करताना सिंह बोलत होते. सशस्त्र दले युद्धभूमी असो अथवा नैसर्गिक आपत्ती, लोकांचा बचाव असो दोन्ही ठिकाणी सर्वोत्तम काम करतात. असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. या कार्यक्रमाला सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह, लष्कराचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ तसंच दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिका आणि युरोपिय संघटनेदरम्यान सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका जर्मनीमधील आपल्या सैन्याची संख्या कमी करेल. असा निर्णय राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केला आहे. युरोपीय सुरक्षेप्रती अमेरिकेची बांधिलकी कमी करण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे जर्मन चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी ट्रंप याचा असलेला वाद समोर आला आहे. जर्मनीमधील अमेरिकन सैन्याची तैनाती सध्या 36 हजारहून अधिक सक्रिय सैनिक आहेत, इटलीमध्ये सुमारे 12 हजार आणि युनायटेड किंगडममध्ये 10 हजार अमेरिकन सैनिक तैनात आहेत.

**<u>विमान-कंपनी</u>**

आपल्या किफायतशीर दरांसाठी ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकन विमान कंपनी स्पिरिट एअरलाइन्सने 34 वर्षांनंतर आपला व्यवसाय बंद केल्याची घोषणा केली आहे. एकेकाळी दररोज शेकडो उड्डाणांची सेवा देणाऱ्या आणि एकंदर 17 हजार लोकांना रोजगार देणाऱ्या या अत्यंत कमी खर्चाच्या विमान कंपनीने कामकाज प्रक्रिया तात्काळ परंतू टप्प्याटप्प्याने बंद करत असल्याचं जाहीर केलं आहे. इराणसोबतचं युद्ध आणि त्याचे परिणाम, युद्धामुळे वाढणाऱ्या विमान इंधनाच्या किमतींमुळे टिकून राहणं अशक्य असल्याचं विमान कंपनीने संकेतस्थळावर म्हटलं आहे.

**<u>एस जयशंकर</u>**

जमैका, सुरीनाम, त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या दौऱ्यावर असलेले परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज सकाळी जमैकाची राजधानी किंग्स्टन इथं पोहोचले. जमैकाच्या परराष्ट्रव्यवहार मंत्री कामिना जे. स्मिथ यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. पुढील दोन दिवसांत जमैकातील प्रमुख नेते, व्यापारी समुदाय आणि भारतीय वंशाच्या नागरिकांशी संवाद साधण्यास उत्सुक असल्याचं डॉ जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>भारतीय-रेल्वे</u>**

भारतीय रेल्वेकडून पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी 895 कोटीं रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आल्याची घोषणा काल रेल्वे मंत्रालयानं केली. मेट्रो रेल्वेची क्षमता वाढवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानलं जात आहे. कोलकाता मेट्रो रेल्वेच्या 'उत्तर-दक्षिण कॉरिडॉर'ला बळकटी देण्यासाठी 671 कोटी

रुपयांपेक्षा अधिकच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये 291 कोटी रुपयांहून अधिक खर्चाने सात नवीन 'ट्रॅक्शन सबस्टेशन्स' उभारण्याच्या तरतुदीचा समावेश आहे.

**नीट परीक्षा**

पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीट यूजी आज देशभरात होणार आहे. नियोजित वेळेनुसार दुपारी दोन वाजता परीक्षा सुरू होणार असून संध्याकाळी पाच वाजता ती संपेल. विद्यार्थ्यांनी वेळेआधी अर्धा तास परीक्षा केंद्रांत पोहोचणे अपेक्षित आहे.

**हवामान**

अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, केरळ, माहे, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीम, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकल या भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.